दि. ०२/१०/२०१८

# हडपसर येथील रिक्षा चालकाचा खुन झाल्यावर काहीएक सुगावा नसताना आरोपी निष्पन्न करुन आरोपीस जेरबंद केले

---

हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १०६६/२०१८ भादविक ३०२, ३०७, ३२६ या गुन्हयातील या गुन्हयातील फिर्यादी नामे संतोष सत्यवान देवकर वय ४२ वर्षे धंदा शेती रा. आकाशीया ४, बंगला नंबर १४, मगरपटटा सीटी, हडपसर, पुणे यांनी फिर्याद दिल्यास की, दिनांक १८/०९/२०१८ रोजी सकाळी ०६/३० वा चे पुर्वी मांजरी फार्म स.नं. ३८ पुणे सोलापूर रोड लगत इराणी नर्सरी समोर, मांजरी ब्रु. पुणे मनोहर देवकर यांचे नर्सरी मध्ये अनोळखी इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष त्याचे अंगावर टि शर्ट काळी पॅन्ट असे कपडे व त्यावर रक्ताचे डाग सदर इसमाची दाढी वाढलेली व डोक्यास बारीक केस असलेले या अनोळखी इसमाचे डोक्यास दगड मारुन त्याला गंभीर जखमी केले म्हणून अज्ञात व्यक्ती विरुध्द फिर्याद दिल्याने वरिल प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर अनोळखी इसमाचा तपास चालू असताना रिक्षा चालक अकबर दौलतखान पठाण वय ३५ वर्षे धंदा चालक हा मयत झाल्याने गुन्हयात भा.द.वि.क ३०२ प्रमाणे कलम वाढ करण्यात आली होती. तेव्हा मा. श्री. समीर शेख सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे -१ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हयाचा समांतर तपास हा व. पो. नि. श्री. दिनकर मोहिते युनिट ३, गुन्हे शाखा व व. पो. नि. श्री. नावंदे फरासखाना पो. स्टे. पुणे यांचे मार्गदर्शना खाली गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप देशमाने युनिट ३, गुन्हे शाखा, पुणे, व पो.उप निरीक्षक महेद्र पाटील फरासखाना पो. स्टे. व स्टाफ असे तपास करीत असताना, फरासखाना पोलीस स्टेशन कडील पोलीस नाईक भंडुरे यांना मिळालेल्या माहिती प्रमाणे आणि तांत्रिक विश्लेशन करुन कौशल्याने मिळालेल्या माहिती नुसार गुन्हयातील मयत इसम अकबर पठाण रा. मांजरी, हडपसर, पुणे हा रिक्षा चालक असून गणपती उत्सवा दरम्यान गुन्हयातील आरोपी विकास रघुनाथ सुर्यवंशी रा. लातूर हे त्यांचे दोन साथीदार असे मयत रिक्षावाल्याच्या रिक्षात दारु पिऊन गणपती पहाण्याकरीता निघाले होते. परंतू रिक्षावाल्याला घरी लवकर जावयाचे असल्याने रिक्षा चालकाने रिक्षा भाडयाचे पैसे मागीतले व पुढे जाण्यास नकार दिला या कारणाचा राग येऊन आरोपी मार व त्याचे दोन साथीदार यांनी मयत रिक्षाचालक यास सोलापूर हायवे, शेवाळवाडी रोड लगत मारहाण करुन त्याचे ताब्यातील रिक्षा काढून घेऊन आरोपी रिक्षा सह शिवाजीनगर परिसरामध्ये निघून आले होते व त्या ठिकाणी रिक्षा सोडून ते त्यांचे मुळ गावी निघून गेले होते असे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे विकास रघुनाथ सुर्यवंशी यास लातूर येथून ताब्यात घेऊन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

**सदरची कामगिरी मा. श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त - गुन्हे १. गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली, युनिट ३, गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिनकर मोहिते, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप नारायण देशमाने, पो. ना. संदीप राठोड तसेच फरासखाना पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नावंदे, पो.उप निरी महेंद्र पाटील ,पो. शि. भोकरे, पो.ना. भंडुरे ,पो. शि. वालटे ,पो. शि. सय्यद यांनी केली आहे.**